




# हॅप्पी पेरेंटिंग : बालस्वातंत्र्याचा अर्थ!

डॉ. सुनील गोडबोले, बालविकास तज्ज्ञ.

सकाळ: कुटुंब (19 August 2023)

प्रत्येक पिढी आपल्या पुढच्या पिढीला जास्त स्वतंत्र आणि काही वेळ जास्त बेलगाम समजत आली आहे. पूर्वी गुणी मुलगा म्हणजे आई-वडिलांची आज्ञा पाळणारा असायचा, आत्ताचा गुणी मुलगा म्हणजे आई-वडील ज्याची आज्ञा पाळतात तो! ‘बालस्वातंत्र्य’ म्हणजे नक्की काय, किती असावं, कसं असावं याबद्दल वेगवेगळ्या पालकांशी बोलताना अनेक समज-गैरसमज जाणवले.

## काही पालकांच्या मते बालस्वातंत्र्य म्हणजे

- मुलांनी त्यांचे निर्णय संपूर्णपणे स्वतः घ्यायचे असतात.
- मुलांनी घेतलेल्या निर्णयांचं पालकांनी आनंदानं स्वागत करायचं असतं.
- मुलांचा एखादा निर्णय पटला नाही, तर ‘मृदू’ भाषेत फक्त निषेध नोंदवायचा.
- मुलांच्या दिनक्रमावर लक्ष ठेवायचं नाही. घरी उशिरा आलं तर कारण विचारायचं नाही.
- मुलांच्या मित्र-मैत्रिणींची चौकशी करायची नाही.

- मुलांच्या प्रगतिपुस्तकाकडे बघून फक्त नजर टाकून सही करायची असते.
- मुलं मागतील तेवढा पॉकेटमनी द्यायचा आणि काय खर्च केला हे विचारायचं नसतं.
- मुलांनी शाळेत मारामाऱ्या केल्या, चुकीचं वर्तन केलं, तर ती त्यांची जबाबदारी मानायची.
- मुलांच्या स्क्रीन टाईमवर कुठलेही निर्बंध लावायचे नाहीत.

पालक मित्रांनो, वरील प्रकारचं 'स्वातंत्र्य' हे नक्कीच चुकीचं आहे, हे तुमच्यातल्या प्रत्येकाला मनोमन जाणवत असेल. पण आधुनिकतेच्या हव्यासातून, कधी चढाओढीच्या भावनेतून, कधी लाडातून, कधी लोक काय म्हणतील, या भीतीतून मुलांना नको तितकं स्वातंत्र्य दिलं जातं आणि स्वातंत्र्याचा अर्थच हरवून जातो. मुलं जसजशी मोठी होत जातील, तसतसं त्यांना 'स्वतंत्र विचार करायला शिकवणं' म्हणजे खऱ्या अर्थानं बालस्वातंत्र्य.

## खरं बालस्वातंत्र्य म्हणजे

- मुलांना निर्णय घेण्याची प्रक्रिया शिकवली पाहिजे. अगदी लहान वयापासून आपण मुलांना वेगवेगळे पर्याय देऊन त्यातून एक योग्य पर्याय निवडायला शिकवू शकतो. उदाहरणार्थ, बाहेर जाताना चार 'ड्रेस' दाखवून त्यातील एक निवडायचं स्वातंत्र्य नक्की देऊ शकू.
- मुलांनी एखादी गोष्ट मागितली, तर त्यावर चर्चा करून, त्यातल्या चांगल्या-वाईट परिणामांचा अंदाज घ्यायला लावून मग कृती केली, तर निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य देताना त्याच्या परिणामांची जबाबदारीसुद्धा घ्यायला मुलं सक्षम होतील.
- वयानुसार अनुभवांच्या कमतरतेमुळे मुलं योग्य निर्णय घेऊ शकणार नाहीत; तसंच प्रलोभनांना बळी पडू शकतात हेही वास्तव आहे. अशा वेळेस पालकांनी अधिकारानं आणि संयमानं निर्णय घ्यायला लागतात.

रोपटं लहान असताना त्याला संरक्षण लागतंच; पण त्याचा वृक्ष झाला, की तोच वृक्ष इतरांना संरक्षण देतो.

(लेखक ज्येष्ठ बालविकासतज्ज्ञ आहेत.)

www.chiranjeevgodbole.com

सकाळ



हॅप्पी पेरेंटिग...

डॉ. सुनील गोडबोले



# हॅप्पी पेरेंटिग : अपेक्षांचे ओझे!

डॉ. सुनील गोडबोले, बालविकास तज्ञ.

सकाळ: कुटुंब (5 August 2023)